**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 26-04-2024**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये मौदा ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-04-26 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2024-04-27 | 2024-04-28 | 2024-04-29 | 2024-04-30 | 2024-05-01 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 3.2 | 2.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 39.4 | 39.7 | 40.5 | 41.3 | 42.1 |
| किमान तापमान (अं.से) | 25.5 | 25.2 | 25.6 | 26.1 | 26.7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 62 | 66 | 61 | 55 | 52 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 39 | 40 | 38 | 35 | 33 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 6 | 6 | 6 | 7 | 5 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 119 | 137 | 169 | 273 | 323 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 3 | 3 | 2 | 2 | 2 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक २७ ते ०१, मे २०२४ दरम्यान आकाशआंशिक ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक २७ व २८ एप्रिल २०२४ रोजी खूप हलक्या ते हलक्यास्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक २९ एप्रिल ते ०१, मे २०२४ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता, • दिनांक २७ एप्रिल २०२४ रोजी वादळी वाऱ्यासह (४० ते ५० किमी/तास) मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यतावर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• कृषी रसायने फवारणी आणि उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे पुढील २४ तासानंतर सुरु ठेवावी. कृषी रसायनांच्या फवारणीच्या वेळी स्थानिक स्वच्छ व शांत हवामान असल्याची खात्री करावी. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर वइतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • पाऊस व वादळी वाऱ्यामुळे फळांची गळ व होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि फळांचा दर्जा खराब होऊ नये म्हणून टोमॅटो, वांगी,संत्रा, मोसंबी इत्यादी बाजारायोग्य तयार फळांची काढणी करून विक्री करावी. • वादळी वाऱ्यामुळे व पावसापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी फळबागा व भाजीपाला पिकांना बांबूचा आधार द्यावा. • नवीन लागवड केलेल्या १ ते ४ वर्ष वयाच्या फळझाडांच्या आळ्यात पाला पाचोळा, गव्हांड्याचे आच्छादन करावे. लहान रोपांवर पऱ्हाटी किंवा तुऱ्हाटीचे छप्पर करावे. • एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी पिक काढणी नंतर शेताची नांगरणी करावी. • माती परीक्षण केले नसल्यास शास्त्रीय पद्धतिने नमून घेऊन कृषी विद्यापीठ, शासकीय किंवा अधिकृत माती परीक्षण प्रयोगशाळेत नमुने पाठवून माती परीक्षण करून घ्यावे. • ऊस, उन्हाळी भुईमुग, तीळ व मुग या पिकांना जमिनीतील उपलब्ध ओलावा व पिकाची गरज लक्षात घेऊन ६ ते ७ दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. उन्हाळी भाजीपाला पिकाचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी ग्रीन शेड नेट चा वापर करावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| • एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी पिक काढणी नंतर शेताची नांगरणी करावी. |
|---|

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भुईमूग | • भुईमुग पिकावरील तांबेरा आणि टिक्का या रोगाचे नियंत्रणाकरिता टेबूकोनाझोल २५ टक्के डब्ल्यू. जी. ५०० ते ७५० ग्राम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून (१० ते १५ ग्राम प्रती १० लिटर पाणी) फवारणी करावी.फूलकिड्यांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसानीची संकेत पातळी ५ फुलकिडे प्रति शेंडा गाठल्यावर क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही १४०० मिली प्रति हेक्टरी ५०० लिटर (२८ मी.ली./१० लिटर पाणी) पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • वादळी वारा व गारपीटीमुळे झाडांची पानगळ होऊन फांद्या आणि खोडांना जखमा झालेल्या असतील. त्यामुळे अन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे अश्या जखमांवर बोर्डो पेस्ट लावावे. • बगीच्यांमध्ये तुटलेल्या फांद्यांची कात्रीच्या सहाय्याने छाटणी करावी. त्यानंतर लगेच १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम व १ किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वादळी पावसामुळे काही झाडे वाकली असतील किंवा पूर्ण कोलमडून पडली असतील तर अश्या झाडांना पाउस झाल्यानंतर ट्रॅक्टर च्या सहायाने मुख्य खोडाला उंचीच्या मधोमध मजबूत दोर बांधून सरळ उभे करावे व बांबुचा आधार द्यावा. मेफेनोक्साम ४ % + मॅन्कोझेब ६४ % २.५ लिटर पाण्यात मिसळून झाड ओले होईपर्यंत फवारणी करावी. • संत्रा / मोसंबीची अंबिया बहारात फळगळ रोखण्याकरिता व फळांचा आकार वाढविण्याकरिता १.५ ग्रॅम २,४-डी + १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम + १.५ किलोग्राम युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून लवकरात लवकर फवारणी करावी. गारपिटीसह पावसाची पुनरावृत्ती झाल्यास वरील फवारणीची पुनरावृत्ती होऊ शकते. गारपिटीसह पावसाची पुनरावृत्ती झाल्यास वरील फवारणीची पुनरावृत्ती पुन्हा करू शकता. • वरील फवारणीच्या पंधरा दिवसानंतर दुसरी फवारणी १.५ ग्रॅम जिब्रेलिक आम्ल, १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम, १.५ किलोग्राम युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून करावी. • सद्य स्थितीतील तापमान लक्षात घेता, फळबागेस जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणी द्यावे. ठिबक सिंचन संच उपलब्ध असल्यास १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला १४ ते ६३ लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला ८७ ते १४३ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १६३ ते २०४ लिटर प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. तापमानातील वाढ लक्षात घेता शेतातील गवत, तणस, गव्हांडा, कुटार असल्यास झाडाभोवती ५ ते १० सेमी. थर देऊन आच्छादन द्यावे, यामुळे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते व जमिनीत ओलावा टिकून राहतो आणि आंबिया बहराची फळगळ कमी होण्यास मदत होते. |
| स्वेट ऑरेंज | • वादळी वारा व गारपीटीमुळे झाडांची पानगळ होऊन फांद्या आणि खोडांना जखमा झालेल्या असतील. त्यामुळे अन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे अश्या जखमांवर बोर्डो पेस्ट लावावे. • बगीच्यांमध्ये तुटलेल्या फांद्यांची कात्रीच्या सहाय्याने छाटणी करावी. त्यानंतर लगेच १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम व १ किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वादळी पावसामुळे काही झाडे वाकली असतील किंवा पूर्ण कोलमडून पडली असतील तर अश्या झाडांना पाउस झाल्यानंतर ट्रॅक्टर च्या सहायाने मुख्य खोडाला उंचीच्या मधोमध मजबूत दोर बांधून सरळ उभे करावे व बांबुचा आधार द्यावा. मेफेनोक्साम ४ % + मॅन्कोझेब ६४ % २.५ लिटर पाण्यात मिसळून झाड ओले होईपर्यंत फवारणी करावी. • संत्रा / मोसंबीची अंबिया बहारात फळगळ रोखण्याकरिता व फळांचा आकार वाढविण्याकरिता १.५ ग्रॅम २,४-डी + १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम + १.५ किलोग्राम युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून लवकरात लवकर फवारणी करावी. गारपिटीसह पावसाची पुनरावृत्ती झाल्यास वरील फवारणीची पुनरावृत्ती होऊ शकते. गारपिटीसह पावसाची पुनरावृत्ती झाल्यास वरील फवारणीची पुनरावृत्ती पुन्हा करू शकता. • वरील फवारणीच्या पंधरा दिवसानंतर दुसरी फवारणी १.५ ग्रॅम जिब्रेलिक आम्ल, १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम, १.५ किलोग्राम युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून करावी. • सद्य स्थितीतील तापमान लक्षात घेता, फळबागेस जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणी द्यावे. ठिबक सिंचन संच उपलब्ध असल्यास १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला १४ ते ६३ लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला ८७ ते १४३ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १६३ ते २०४ लिटर प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. तापमानातील वाढ लक्षात घेता शेतातील गवत, तणस, गव्हांडा, कुटार असल्यास झाडाभोवती ५ ते १० सेमी. थर देऊन आच्छादन द्यावे, यामुळे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते व जमिनीत ओलावा टिकून राहतो आणि आंबिया बहराची फळगळ कमी होण्यास मदत होते. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कागदी लिंबू | • पिकाची गरज व जमिनीतील उपलब्ध ओलावा लक्षात घेऊन आवश्यकता असल्यासच लिंबाच्या १ ते ४ वर्ष वयाच्या झाडास ११ ते २७ लिटर पाणी प्रती दिवस प्रती झाड द्यावे, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडास ३४ ते ५३ लिटर पाणी प्रती दिवस प्रती झाड द्यावे, ८ ते १० वर्ष वयाच्या झाडास ६५ ते १०० लिटर पाणी प्रती दिवस प्रती झाड द्यावे. |
| कोबी | • सद्य परिस्थितील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील मावा किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० ईसी १३ मिली किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी १२ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • सद्य परिस्थितील ढगाळ हवामान लक्षात घेता, कोबी व फुल कोबीवरील वरील चौकोनी ठीपक्याच्या पतंग कीड व्यवस्थापनासाठी, क्लोरपायरीफॉस २० ईसी ४० मिली किंवा स्पिनोसॅड २.५ एससी १२ मिली किंवा फेनवलेरेट २० ईसी ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • फवारणीची कामे हि स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| टोमॅटो | • पाऊस व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता फळांची गळ व होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि फळांचा दर्जा खराब होऊ नये यासाठी बाजारायोग्य तयार फळांची काढणी करून विक्री करावीव झाडांना बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • सततच्या ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकावर उशिरा येणाऱ्या करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी स्वच्छ हवामन परिस्थिती असताना कॉपर ऑक्सिक्लोराईड (३.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा बोर्डो मिश्रण (१ %) किंवा कॉपर हायड्रॉक्साईड (२.० ग्रॅम/लि.) किंवा फोसेटील एएल ( ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा डायमिथोमोर्फ (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा पुर्वमिश्रित बुरशीनाशक पायराक्लोस्ट्रोबिन + मेटीराम (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेफेनोक्झाम + कॉपर ऑक्सिक्लोराईड (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) किंवा मेटालीक्सील ८ % + मॅन्कोझेब ६४ % (२.० ग्राम प्रती लिटर पाणी) या प्रमाणातफवारणी करावी. |
| मिरची | • फुलांची गळ कमी करण्यासाठी प्लॅनोफिक्स ५ मी.ली., प्रती ९ लिटर पाण्यात मिसळून मिरची लागवडीनंतर ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी. सद्यपरिस्थितीत मिरची पिकावरील रसशोषक किडीच्या नियंत्रणाकरिता, ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ईमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.मिरची पिकामध्ये फुलकिडे, फळे पोखरणारी अळी व तंबाखूची पाने खाणारी अळीने आर्थिक नुकसान पातळी असल्यास सायन्ट्रानिलिप्रोल १०.२६ ओडी १२.० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| टरबूज | • पाऊस व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता फळांची गळ व होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि फळांचा दर्जा खराब होऊ नये यासाठी बाजारायोग्य तयार फळांची काढणी करून विक्री करावी. |
| खरबूज | • पाऊस व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता फळांची गळ व होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि फळांचा दर्जा खराब होऊ नये यासाठी बाजारायोग्य तयार फळांची काढणी करून विक्री करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. ज्या शेतकऱ्यांनी बरसीम या चारा पिकाची लागवड केली असेल त्यांनी, प्रत्येक कापणीनंतर योग्य वाढ आणि चाऱ्याच्या जास्त उत्पादनासाठी प्रती हेक्टर १० किलो नत्र उभ्या पिकात द्यावे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याच्या मदतीने जनावरांना जंत नाशकाची मात्रा/लस द्यावी. |
| गाय | • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर वइतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी व सावलीमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करावी. जनावरांकडून (उदा. बैल) सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजता दरम्यान काम करणे टाळावे. गोठ्यातील तापमान गोठ्याचे शेड ला पांढरा रंग द्यावा. शक्य असल्यास शेड मध्ये पाण्याचा फवारा व फोगर्स चा लावावे. जास्त उष्णतेच्या काळात जनावरांच्या अंगावर पाणी फवारावे. जनावरांच्या आहारात हिरवा चारा, प्रथिने, खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |